॥ सहकारे साधे समता ॥

"एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ"

स्थापना : २८ ऑगस्ट १९८९

"जनसामान्यांच्या विश्वासाचं प्रतिक"

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

## अंबरनाथ, जि. ठाणे

नोंदणी क्रं. टी. एन्. ए. /यू. एल. आर./आर.एस.आर.(सी. आर.)/३७४/सन १९८९-९०

कार्यालय : ३०४६ इंदिरा गांधी चौक, महालक्ष्मी नगर, अंबरनाथ (पु.), जि. ठाणे - ४२१ ५०१.

विस्तार कक्ष : छत्रपती शिवाजी मार्केट, गाळा क्र. ३६, अंबरनाथ (प.) जि. ठाणे

सहकारात ऐपतीपेक्षा पतिला महत्व आहे.

विना सहकार नाही उध्दार

# बारावा वार्षिक अहवाल सन २०००-२००१

ऑडिट वर्ग 'अ'

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ, जि. ठाणे

## संचालक मंडळ

| | | |
|---|---|---|
| श्री. जयवंतराव बंडू काटकर | – | अध्यक्ष |
| श्री. अविनाश नारायण खानविलकर | – | उपाध्यक्ष |
| श्री. शशिकांत मनोहर शिर्के | – | सचिव |
| श्री. प्रकाश शंकर पवार | – | खजिनदार |
| श्री. हणमंत सदाशिव घनवट | – | संचालक |
| श्री. प्रकाश शंकर पाटील | – | संचालक |
| श्री. भगवान अर्जुन ऊतेकर | – | संचालक |
| श्री. मनोहर पांगळू जाधव | – | संचालक |
| श्री. बाबुराव नामदेव साठे | – | संचालक |
| श्री. शंकर जिवा शेलवले | – | संचालक |
| सौ. मंगला श्रीधर ढाले | – | संचालिका |
| सौ. प्रिती प्रदिप नलावडे | – | संचालिका |
| सौ. निलम अनंत आंब्रे | – | संचालिका |

## अंतर्गत हिशोब तपासणीस

**श्री. विजय अमृत पाटील**
(बी.कॉम.जी.डी.सी. ॲण्ड ए.)

**श्री. तुकाराम अंबाजी शेंडे**

## बँकर्स

- **दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अंबरनाथ.**
- **डोंबिवली नागरी सहकारी बँक लि., अंबरनाथ.**
- **जयहिंद को. ऑप. बँक लि., अंबरनाथ.**

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

## अंबरनाथ, जि. ठाणे

## १२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांसाठी)**

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ ह्या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची बारावी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार, दि. १२.८.२००१ रोजी स. १०.०० वा. महात्मा गांधी विद्यालय, अंबरनाथ (प.)** येथे खालील विषयांचा विचार करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी या सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे, हि विनंती.

### सभेपुढील विषय

१) *मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.*

२) *दि. ३१ मार्च २००१ रोजी संपणाऱ्या सहकारी वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफा - तोटा पत्रकास मंजूरी देणे.*

३) *दि. ३१ मार्च २००१ रोजी संपणाऱ्या सहकारी वर्षाच्या नफा विभागणी पत्रकास मंजूरी देणे.*

४) *सन २००१ - २००२ च्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे.*

५) *सन २००१ - २००२ सालाकरिता अंतर्गत हिशोब तपासणीसांची निवड व मानधन ठरवणे.*

६) *पोटनियम दुरुस्तीस मंजूरी देणे. (सोबत उपविधी दुरुस्ती प्रकरण जोडले आहे.)*

७) *कर्जाच्या थकबाकीवर विचार विनियम करणे.*

८) *आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर मा. अध्यक्षांच्या परवानगीने चर्चा करणे.*

**श्री. शशिकांत मनोहर शिर्के**

**अंबरनाथ.**

(सचिव)

**दिनांक : १५.७.२००१**

**श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या., अंबरनाथ.**

(संचालकमंडळाच्या परवानगीनुसार)

### सूचना

१) **पुरेशा गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास अर्ध्या तासानंतर त्याच दिवशी, त्याच ठिकाणी, त्याच विषयांवर बोलिविण्यात येईल. त्यास गणसंख्येचे बंधन राहणार नाही.**

२) **ज्या सभासदांना कामकाजाविषयी प्रश्न विचारावयाचे असतील अगर सुचना द्यावयाच्या असतील त्यांनी आपल्या सुचना अगर प्रश्न दि. ८.८.२००१ पूर्वी लेखी स्वरुपात संस्थेच्या कार्यालयीन वेळेत कार्यालयात आणून द्यावेत.**

३) **ज्या सभासदांनी सन १९९७-९८ ते ९९-२००० चा लाभांश घेतला नसल्यास घेणे अन्यथा तो राखीव निधीत जमा केला जाईल याची नोंद घ्यावी.**

४) **सभेस येतांना सभासदांनी आपला अहवाल सोबत आणावा.**

# १२ वा वार्षिक अहवाल

सन्माननीय सभासद बंधू - भगिनींनो,

आपल्या पतसंस्थेचे बारावे आर्थिक वर्ष ३१ मार्च २००१ रोजी संपले. सदर आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल व हिशोब पत्रके आपल्यासमोर ठेवतांना मला अतिशय आनंद होत आहे. संस्थेने या आर्थिक वर्षात केलेली प्रगती पाहून आपणांसही आनंद वाटेल. याची मला खात्री आहे.

**इवलेसे रोप लावियेले द्वारी**
**त्याचा वेलू गेला गगनांवरी.**

गेल्या बारा वर्षातील प्रगतीचे टप्पे पाहता आपल्या पतसंस्थेची वाटचाल वरील उक्तीची प्रचितीच दर्शविते. समाजातील आर्थिक दुर्बल घटक, तळागाळांतील कष्टकरी समाज, भाजीवाले, छोटे-मोठे विक्रेते, लघुउद्योजक, छोटे व मध्यम व्यापारी, औद्योगिक कामगार मध्यमवर्गीय नागरीक यांना विविध कर्ज योजनांद्वारे आर्थिक मदतीचा हात देऊन त्यांना समाजात प्रतिष्ठेने व स्वाभिमानाने उभे करणे, त्यांना स्वप्नपूर्तीचा आनंद देणे, त्यांचे अश्रु पुसणे हाच संस्थेचा प्रमुख उद्देश आहे.

सहकार चळवळीतील स्वाहाकारी भूमिका पुढे येऊ नये म्हणून विशिष्ट ध्येयाने व शिस्तीच्या सामाजिक बांधिलकीतून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या तालमीत संस्थेची खंबीर वाटचाल चालू आहे व म्हणूनच संस्थेचा प्रगतीदर्शक तक्ता दिवसेंदिवस प्रगतीचा एकेक टप्पा यशस्वीपणे पादाक्रांत करीत आहे. याचा मला विशेष उल्लेख करावासा वाटतो.

सभासदांना काटकसरीची व सहकार्याची जोपासना करण्यास प्रोत्साहन देणे, त्यांच्याच कडून विविध प्रकारच्या ठेवी गोळा करणे, तसेच गरजू व इच्छूक ग्राहकांस त्यांची आर्थिक कुवत व कर्ज परतफेडीची क्षमता बघून कर्ज देणे. उद्योजक, डॉक्टर्स वगैरे लहान मोठ्या व्यावसायिकांना कर्ज देऊन जनतेत मानाचे व विश्वासाचे स्थान निर्माण केले आहे. आजमितीस संस्थेच्या दैनंदिन व्यवहारात सुमारे १५५० ठेवीदार असून ५०० छोटे-मोठे कर्जदार आहेत.

देशातील आर्थिक स्थिती, बँकींग क्षेत्रातील शिथिलीकरण व जागतिक विचारधारेशी जमवून घेण्याच्या धोरणातून वित्तीय क्षेत्रात झालेले अमुलाग्र बदल व त्याचा बसलेला दृश्य फटका आपल्यासारख्या पतसंस्थांना सोसावा लागत आहे. तरीही संस्थेच्या मार्गदर्शक, व्यवस्थापन समिती व कर्मचारी वर्गाच्या कौशल्यपूर्ण व लवचिक धोरणांमुळे व संस्थेच्या स्वच्छ मार्गदर्शक धोरणांमुळे आपली संस्था याही परिस्थितीत यशस्वी वाटचाल करीत आहे, हे विशेषकरुन नमूद करावेसे वाटते.

संस्थेच्या सुरुवातीच्या काही वर्षात संस्थेच्या शिस्तीच्या व निष्कलंक वागणूकीबद्दल काही गैरसमज पसरविले गेले, परंतु कालांतराने है गैरसमज आपोआपच दूर होऊन संस्थेचा जनाधार वेगाने वाढत गेला व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी आम्ही संस्थेचे संचालक नसून विश्वस्त आहोत ही संकल्पना रुजविल्यामुळे व व्यक्तिपेक्षा संस्था मोठी हे तत्व प्रत्यक्षात राबविल्यामुळे समाजातील सर्व घटकांकडून ठेवी व कर्ज या दोन्ही विभागात मोठी मागणी निर्माण करण्यांत संचालकांना यश मिळत गेले हेच प्रगतीचे मोठे इंगित आहे.

संस्थेचे आर्थिक व्यवहार सहकारी कायदा, नियम-पोटनियम यांचे आधारे व्हावे त्याचप्रमाणे दैनंदिन कामकाज सुरळीत व्हावे या दृष्टीकोनातून व्यवस्थापक मंडळाने संस्थेच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ठ समोर ठेवले या अनुशंघाने सहकार प्रशिक्षण केंद्र मुंबई तर्फे घेण्यात आलेल्या नागरी सहकारी पतसंस्था सेवक क्षेत्रिय कार्यक्रम या दोन महिन्याच्या अभ्यासवर्गास संस्थेने श्री. सुनील ह. घनवट, श्री. आनंदा विठ्ठल पाटील, कु. निलीमा सु. दिवाकर, कु. अर्चना गो. पार्टे या कर्मचाऱ्यांस पाठविले होते. सर्व कर्मचारी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. त्याचप्रमाणे **डिप्लोमा इन को. ऑप. मॅनेजमेंट** या कोर्सला पाठविलेले **श्री. आनंदा विठ्ठल पाटील** हे विशेष योग्यता श्रेणीत उत्तीर्ण होऊन **"सहकार प्रशिक्षण केंद्र, मुंबई."** विभागात सर्व प्रथम आले आहेत. ही संस्थेच्या दृष्टीने भूषणावह बाब आहे. सर्व कर्मचाऱ्यांचे संचालक मंडळातर्फे व सभासदांतर्फे हार्दिक अभिनंदन.

आपले सर्व सभासद, हितचिंतक, ग्राहक व ठेवीदार यांच्या भरघोस पाठिंब्यावर आपल्या संस्थेची गतिमान वाटचाल अशीच सुरु राहिल असा मला विश्वास वाटतो. नवीन सहस्त्रकाच्या उंबरठ्यावर संगणीकरण करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे व नजिकच्या कालावधीत ते पूर्ण होईल असा मला विश्वास आहे.

उत्कृष्ट नियोजन, संचालक मंडळाची एकवाक्यता तसेच योग्य मार्गदर्शन व तत्पर एजंट व प्रशिक्षित कर्मचारी वर्गाच्या सहकार्यानेच व आपल्या सर्व सभासदांच्या भक्कम विश्वासावरच आपले मार्गक्रमण असेच डौलदारपणे सुरु राहो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**१. सभा :**

सन २००० - २००१ या आर्थिक वर्षात संचालक मंडळाच्या १२ सभा झाल्या असून त्यात कर्जमंजूरी व कर्जवाटप एवढाच निकष न ठेवता पतसंस्थेची सर्वांगीण उन्नती कशी होईल याबाबत विचार करुन निर्णय घेतले गेले. सरासरी उपस्थिती ९४% इतकी होती. या मुदतीत दि. ३०.७.२००० रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा व १७.९.०० रोजी विशेष साधारण सभा घेण्यात आली.

**2. सभासद :**

अहवाल वर्षाअखेर सभासद संख्या १२३० इतकी आहे.

**3. भागभांडवल :**

अहवाल वर्षअखेर २२,३७,३००/- रु. भागभांडवल जमा आहे. संस्थेची सांपत्तिक परिस्थिती अधिक

मजबूत होणेसाठी सभासदांनी ज्यादा भागभांडवल खरेदी करावे असे आवाहन करावेसे वाटते.

**४. ठेवी :**

आपल्या संस्थेच्या ठेवींचा वाढता आलेख हे **'जनसामान्यांच्या विश्वासाचे प्रतिक'** आहे. आपल्या सर्वांच्या महकार्याने याही वर्षी आपण ठेवींचे उद्दीष्ठ पूर्ण केले व त्याची विगतवारी खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | योजनेचे नाव | रुपये |
|---|---|---|
| १. | मुदत ठेव | ३५,०५,०००.०० |
| २. | दैनंदिन ठेव | २२,५३,०००.०० |
| ३. | मासिक ठेव | १,३९,०००.०० |
| ४. | बालविकास ठेव | १०,०००.०० |
| ५. | महिला कुंभबचत ठेव | ५९,०००.०० |
| ६. | दिर्घमुदत ठेव | २१,०००.०० |
| | एकूण ठेवी | ५९,८७,०००.०० |

**५. कर्जवाटप :**

नागरी सहकारी पतसंस्थेच्या अनेक उद्दीष्टांपैकी प्रमुख उद्दीष्ट म्हणजे संस्थेच्या सभासदांना व दैनंदिन ग्राहकांना सुलभ पतपुरवठा करणे होय. आपल्या संस्थेचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे कर्जपुरवठा करतांना सवंग लोकप्रियता गौण मानून सभासदांच्या व ग्राहकांच्या एकूण आर्थिक परीस्थितीचा विचार करुन व कर्जपरत फेडीच्या क्षमतेचा अभ्यास करुन जास्तीत जास्त सभासद व ग्राहकांना कर्जवाटप केले आहे. मला अभिमानाने असा उल्लेख करावासा वाटतो की, कर्जसमितीचे सदस्य श्री. हणमंत सदाशिव घनवट, श्री. शशिकांत मनोहर शिर्के, श्री. प्रकाश शंकर पाटील, श्री. अविनाश नारायण खानविलकर, सौ. मंगला श्रीधर ढाले यांनी कर्जवाटपाची जबाबदारी यशस्वीपणे पार पडली. संस्थेच्या गतवर्षीच्या कर्जवाटपाची आकडेवारी खालीलप्रमाणे :-

| | कर्जप्रकार | कर्जवाटप रुपये |
|---|---|---|
| १) | मध्यम मुदत कर्ज | ४४,३३,०००.०० |
| २) | दैनंदिन ठेव कर्ज | १९,६७,०००.०० |
| ३) | मुदत ठेव तारण कर्ज | १,४६,०००.०० |
| ४) | सोने तारण कर्ज | १,८३,०००.०० |
| ५) | वस्तू खरेदी तारण कर्ज | ३,०३,०००.०० |
| ६) | एन्.एस्.सी. तारण कर्ज (राष्ट्रीय बचत रोखे) | १,४०,०००.०० |
| एकूण | | ७१,७२,०००.०० |

## ६. कर्जवसूली :

कोणत्याही यशस्वी वित्तीय संस्थेचे मर्म कर्जवसुलीतच असते. सन ९९-२००० अखेर रु. ५८,९१,५८१/- कर्ज येणे बाकी होते. अहवाल सालात रुपये ७१,७२,००० इतके कर्जवाटप झाले आहेत. त्यापैकी रु. ४६,८४,१२८ इतके कर्ज वसूल झाले आहे. आर्थिक मंदीमुळे कर्ज हप्ते भरण्याचेही प्रमाण थोडे कमी झाले आहे. याची गंभीर दखल संचालक मंडळाने घेऊन कर्जवसुलीचे काम नेटाने मार्गी लावले आहे.

## ७. ठेवींवरील व्याजाची तरतूद :

ठेवींवरील व्याजाची तरतूद सन २०००-२००१ या आर्थिक वर्षात मुदतपूर्ण झालेल्या व या आर्थिक वर्षात जमा झालेल्या परंतु भविष्यात मुदतपूर्व होणाऱ्या ठेवींसाठी योग्य त्या व्याजाची तरतुद पुढीलप्रमाणे केली आहे.

| | | |
|---|---|---|
| अ | मुदत ठेवी | एकूण देणे ठेव व्याज तरतूद रु. ३,१०,०००/- |
| ब | मासिक ठेवी | |
| क | दैनंदिन ठेवी | |
| ड | बालविकास ठेवी | |
| इ | महिला कुंभबचत ठेवी | |
| फ | दिर्घमुदत ठेवी | |

## ८. गुंतवणूक :

सन २०००-२००१ च्या वर्ष अखेरीस आपल्या पतसंस्थेने एकूण रु. ७,२२,४००.०० इतकी गुंतवणूक ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक व अन्य सहकारी बँकामधून ठेवींद्वारे केली आहे.

## ९. नफा :

सन २०००-२००१ या आर्थिक वर्षात संस्थेला रु. ४,०४,७४२.५० इतका नफा झाला आहे. सदर नफ्यातून संचालकमंडळाने कायदेशीर व धोरणात्मक नफा वाटणी सुचविली आहे.

## १०. आवाहन :

अ) प्रत्येक सभासदाने माझी संस्था म्हणून अधिक भाग खरेदी करावे.

ब) संस्थेने दि. १.४.२००१ पासून सेव्हींग खाते चालू केले आहे. तरी आपल्या पतसंस्थेत किमान एक सेव्हींग खाते उघडावे.

## ११. नवीन व भविष्यकालीन योजना :

१) नजीकच्या काळात उल्हासनगर, बदलापूर या ठिकाणी प्रातिनिधीक कार्यालये सुरु करणे.

२) संस्थेचं कार्यालय संगणकीकृत करणे.

३) शिक्षणास प्रोत्साहन म्हणून उच्चशिक्षणासाठी शैक्षणिक कर्ज उपलब्ध करणे.

४) वर्ष अखेर रु. १ कोटीचे ठेवींचे लक्ष ठरविले आहे.

## १२. हार्दिक अभिनंदन :

संस्थेचे सन्माननीय संचालक, श्री. प्रकाश शंकर पाटील व श्री. मनोहर पांगळू जाधव, यांचं महाराष्ट्र शासनाने विषेश कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. त्याबद्दल संस्थेच्या सर्व सभासदांच्या वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन.

तसेच संस्थेचे सन्माननीय सभासद श्री. हरिश्चंद्र (बबन) यशवंत येरुणकर, श्री. शांताराम दगडू नरे, श्री. हरिश्चंद्र देवजी शेलार, सौ. विमल नेताजी बेन्द्रे यांची महाराष्ट्र शासनाने विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. त्याबद्दल संस्थेचे संचालक व सभासदांच्या वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन.

संस्थेचे सन्माननीय सभासद व अंतर्गत हिशोब तपासनीस श्री. विजय अमृत पाटील यांचा चिरंजीव कु. विवेक विजय पाटील हा प्राथमिक शिष्यवृत्ती परिक्षेत अंबरनाथ शहरामध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. त्याबद्दल संस्थेच्या वतीने त्याचे हार्दिक अभिनंदन.

संस्थेचे कर्मचारी श्री. आनंदा विठ्ठल पाटील हे **'सहकार प्रशिक्षण केंद्र, मुंबई'** यांचे तर्फे घेण्यात येणाऱ्या **'डिप्लोमा इन को. ऑप. मॅनेजमेंट'** हा अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करुन मुंबई विभागात सर्वप्रथम आले आहेत. त्याबद्‌दल संस्थेचे संचालक व सभासदांच्या वतीने त्यांचे हार्दिक अभिनंदन.

संस्थेचे सभासद श्री. सुरेश दत्तात्रय भोगले यांची पाल्य कु. सीमा सुरेश भोगले हिने राज्य स्तरावर विविध मैदानी स्पर्धांमध्ये भाग घेऊन विशेष, प्राविण्य मिळविले आहे. संस्थेतर्फे हार्दिक अभिनंदन.

## १३. श्रध्दांजली :

अहवाल वर्षात जे सभासद, ठेवीदार, ग्राहक, हितचिंतक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय किर्तीच्या थोर विभूती पंचतत्वात विलिन झाल्या त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

## १४. आभार :

आपल्या संस्थेस वेळोवेळी ज्या ज्या व्यक्तिंनी व संस्थांनी सहकार्य दिले त्यांचा ऋणनिर्देश केल्याशिवाय हा अहवाल परिपूर्ण होणार नाही.

मा. जिल्हा उपनिबंधक व त्यांच्या कार्यालयातील सहकारी, मा. सहा. निबंधक कल्याण व त्यांच्या

कार्यालयातील श्री. जेस्वानी साहेब तसेच अन्य कर्मचारी, लेखापरिक्षक श्री. वैशंपायन साहेब व सहकारी श्री. अधिकारी, श्री. एच. जी. शेटे सभासद सचिव ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड लि. कल्याण, सहकार प्रशिक्षण केंद्र मुंबई मधील उपप्राचार्य श्री. व्ही. व्ही. देसाई, प्राध्यापक श्री. पी. के. कापडणीस व श्री. एम्. टी. जगताप यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शन व सहकार्याबद्दल आभार. त्याचप्रमाणे मा. दादासाहेब नलावडे माजी नगराध्यक्ष अंबरनाथ नगरपरिषद, दि ठाणे जिल्हा मध्य. सह बँक, डोंबिवली नागरी सह. बँक, जयहिंद को-ऑप बँक अंबरनाथ, या सर्व बँकांचे पदाधिकारी व कर्मचारी वर्गाचे सहकार्याबद्दल आभार.

अंतर्गत हिशोब तपासणीस श्री. विजय अमृत पाटील व श्री. तुकाराम अंबाजी शेंडे, यांनी संस्थेच्या दैनंदिन कामकाजात वेळोवेळी मार्गदर्शन केल्याबद्दल मी खास ऋण व्यक्त करतो.

संस्थेच्या गेल्या १२ वर्षाच्या वाटचालीत खंबीर साथ देणाऱ्या सभासद, व्यापारी, ग्राहक, ठेवीदार, कर्जदार तसेच पतसंस्थेबद्दल प्रेम असणारे असंख्य ज्ञात, अज्ञात कार्यकर्ते या सर्वांची संस्था ऋणी आहे.

संस्थेचा कर्मचारी वर्ग व एजंट यांचा प्रामाणिकपणा व अथक परिश्रमांतून ह्या संस्थेची भरभराट होत असल्याची नम्र जाणीवही मी येथे खास करुन नमूद करतो.

सर्वांचा लोभ असावा, वृध्दींगत व्हावा व पतसंस्थेचा उत्कर्ष असाच चालू रहावा ही सदिच्छा व्यक्त करुन मी हा अहवाल पूर्ण करतो.


जयहिंद ! जय सहकार !!

आपला

**श्री. जयवंतराव बंडू काटकर**

**अध्यक्ष**

**श्री. महालक्ष्मी नागरी सहाकारी पतपेढी मर्यादित, अंबरनाथ.**



# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

## अंबरनाथ, जि. ठाणे

## तेरीज - पत्रक १/४/२००० ते ३१/३/२००१

| जमा | रक्कम रुपये | नावे | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| आरंभीची शिल्लक रोख | ४९,३९६.०० | भाग परत | ६५,२९०.०० |
| बँक | २४,९७०.५० | दै. ठेव परत | ४२,४६,६४८.०० |
| भाग जमा | ५,३०,६८०.०० | म. मुदत कर्ज वाटप | ४४,३३,६१९.०० |
| दै. ठेव जमा | ४६,८६,५४१.०० | दै. ठेव तारण कर्ज | १९,६७,७३०.०० |
| म. मुदत कर्ज वसुल | २६,१३,३९५.०० | मुदत ठेव तारण कर्ज | १,४६,८००.०० |
| दै. ठेव तारण कर्ज | १९,७९,३३९.०० | वस्तू खरेदी ता. कर्ज | ३,०३,५००.०० |
| मुदत ठेव ता. कर्ज | १७,०००.०० | रा. ब. रोखे तारण कर्ज | १,४०,०००.०० |
| वस्तू खरेदी ता. कर्ज | २३,५५०.०० | सोने तारण कर्ज | १,८३,४००.०० |
| रा. ब. रोखे ता. कर्ज | ४००.०० | व्याज वसूल | १६,०८०.०० |
| सोने तारण कर्ज | ५२,०५०.०० | मा. ठेव परत | ६०,७९०.०० |
| व्याज जमा | १२,१३,३४०.०० | मुदत ठेव परत | १९,७६,९५९.०० |
| मासिक ठेव जमा | १,७२,४१५.०० | बा. विकास ठेव परत | ५००.०० |
| मुदत ठेव | ३९,१२,०१२.०० | दैनंदिन कमिशन | १,४२,२४५.०० |
| बाल विकास ठेव | १०,६००.०० | किरकोळ खर्च | १५,२४५.०० |
| म. कुंभ बचत ठेव | ५९,१३८.०० | प्रवास खर्च | १०,४४६.५० |
| दिर्घ मुदत ठेव | २१,१००.०० | दसरा/लक्ष्मीपूजन खर्च | २,३८६.०० |
| प्रवेश फी | २७३.०० | ठेव व्याज | २,८०,५६१.०० |
| ना. सभा फी | ६,३६०.०० | कर्मचारी वेतन | १,१७,१२८.०० |
| दै. ठेव कमिशन | १२,१२९.०० | सानुग्रह अनुदान | ६,२४०.०० |
| ठेव व्याज वसूल | २,२५०.०० | लाभांश वाटप | १,४९,००८.०० |
| बँक चार्जेस वसूल | २३२.०० | टेलिफोन खर्च | १,३४४.०० |
| अनामत | ३१,४००.०० | अनामत | ३१,४००.०० |
| मुद्रांक शुल्क | ३,४८०.०० | गुंतवणूक | ६,३५,०००.०० |
| बँक व्याज जमा | १२,५०७.०० | वीज बील | ३,६५३.०० |
| नोटीस फी वसुल | ७,२००.०० | मुद्रांक शुल्क | ३,७८०.०० |
| इमारत निधी | २०,२००.०० | वा. सा. सभा. खर्च | ८,५४२.०० |
| बँक लाभांश | १८.०० | विशेष सा. सभा खर्च | २००.०० |
| सर्व्हीस चार्जेस वसूल | १,२०९.०० | जाहिरात | १०,९२१.०० |
| छपाई लेखन साहित्य | १३,७३०.०० | कार्यालय डिपॉझिट | १,००,०००.०० |
| कार्यालय डिपॉझिट जमा | २,०००.०० | कार्यालय भाडे | २३,६००.०० |
| किरकोळ जमा | २,१२८.०० | शिक्षण निधी | ५,०००.०० |
| | | कर्मचारी प्रशिक्षण खर्च | ६,८२८.०० |
| | | वा. अकौंटीग चार्जेस | २,०००.०० |
| | | डेड स्टॉक | २२,८१५.०० |
| एकूण रुपये | १,५४,८१,०४२.५० | एकूण रुपये | १,५१,१९,६५८.५० |



पुढील पानावर....

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

## अंबरनाथ, जि. ठाणे

## तेरीज - पत्रक १/४/२००० ते ३१/३/२००१

| जमा | रक्कम रुपये | ~~जमा~~ नावे | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| मागील पानावरुन .... | १,५४,८१,०४२.५० | मागील पानावरुन .... | १,५१,१९,६५८.५० |
| | | ऑडिट फी | ७,११०.०० |
| | | पोस्टेज / टेलिग्राम | २,०२९.०० |
| | | टेली. अनामत | १,०००.०० |
| | | वीज अनामत | ३७०.०० |
| | | सभासद वर्गणी | ५००.०० |
| | | बँक चार्जेस | १३२.०० |
| | | लॉकर चार्जेस | ३५०.०० |
| | | छपाई लेखन साहित्य | ५०,५४०.०० |
| | | नोटीस फी | १००.०० |
| | | अंतर्गत हि. त. मानधन | ६,०००.०० |
| | | संचालक भत्ता | ४,४१०.०० |
| | | सचिव मानधन | ३,०००.०० |
| | | सर्व्हीस चार्जेस | ६५४.०० |
| | | अखेरची शिल्लक रोख | २४,००२.०० |
| | | बँक | २,६०,३४७.०० |
| एकूण रुपये | १,५४,८१,०४२.५० | एकूण रुपये | १,५४,८१,०४२.५० |

**श्री. शशिकांत म. शिर्के**
सचिव

**श्री. प्रकाश शं. पवार**
खजिनदार

**श्री. अविनाश ना. खानविलकर**
उपाध्यक्ष

**श्री. जयवंत बं. काटकर**
अध्यक्ष

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

## अंबरनाथ, जि. ठाणे

## ताळेबंद

| रक्कम रुपये १९९९–२००० | जबाबदाऱ्या व देणे | | रक्कम रुपये २०००–२००१ |
|---|---|---|---|
| २०,००,०००.०० | **अधिकृत भाग भांडवल** | | ५०,००,०००.०० |
| १७,७२,२१०.०० | वसुल भाग भांडवल | | २२,३७,३००.०० |
| २,२०,२२८.०० | **राखीव निधी** | ३,३४,६०४.०० | |
| ६१.०० | प्रवेश फी | २७३.०० | |
| ३१०.०० | नाममात्र सभासद फी | ६,३६०.०० | |
| ५०,४३२.०० | लाभांश वर्ग | ४,४९४.०० | ३,४५,७३१.०० |
| १,३०,९७४.०० | **इतर निधी** | | |
| ५३,०१५.०० | इमारत निधी | ७५,२१५.०० | |
| २१,८१६.०० | लाभांश समीकरण निधी | २३,८१६.०० | |
| १०,६१५.०० | सभासद कल्याण निधी | १२,६१५.०० | |
| २४,८१५.०० | संशयीत व बुडीत कर्ज निधी | २६,८१५.०० | |
| ११,२१३.०० | धर्मदाय निधी | १२,२१३.०० | |
| ९,५००.०० | रौप्य महोत्सव निधी | १४,०००.०० | १,६४,६७४.०० |
| ३४,१०,३७६.०० | **ठेवी** | | |
| १५,६९,९२५.०० | मुदत ठेव | ३५,०४,९७८.०० | |
| १८,१३,०३६.०० | दैनंदिन ठेव | २२,५२,९२९.०० | |
| २७,४१५.०० | मासिक ठेव | १,३९,०४०.०० | |
| – | बालविकास ठेव | १०,१००.०० | |
| – | महिला कुंभबचत ठेव | ५९,१३८.०० | |
| – | दिर्घमुदत ठेव | २१,१००.०० | ५९,८७,२८५.०० |
| ३,११,२६८.०० | **देणी व तरतुदी** | | |
| २,०२,९७५.०० | देणे ठेवीवरील व्याज | ३,१०,०६९.०० | |
| ७,१५०.०० | देणे ऑडीट फी | १०,०००.०० | |
| ६,१३८.०० | शिक्षण निधी | ६,१३८.०० | |
| ५,०००.०० | कर्मचारी बोनस | १०,६००.०० | |
| २,०००.०० | देणे अकौऊटिंग चार्जेस | २,०००.०० | |
| ७०४.०० | देणे अनामत | ७०४.०० | |
| २६,०००.०० | देणे भेटवस्तु | २६,०००.०० | |
| ६१,३०१.०० | देणे लाभांश | ८३,८७७.०० | ४,४९,३८८.०० |
| २,५४,७११.५० | **नफा** | | |
| ४२१.०० | शिल्लक नफा (सन ९९–००) | ४१७.५० | |
| २,५४,२९०.५० | चालू नफा (सन ००–०१) | ४,०४,७४२.५० | |
| | | | ४,०५,१६०.०० |
| ६१,५०,५७०.५० | एकूण | | ९५,८९,५३८.०० |

**श्री. शशिकांत म. शिर्के**
सचिव

**श्री. प्रकाश शं. पवार**
खजिनदार

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

## अंबरनाथ, जि. ठाणे

## पत्रक (३१.३.२००१ अखेर)

| रक्कम रुपये १९९९ – २००० | संपत्ती व येणे | | रक्कम रुपये २०००– २००१ |
|---|---|---|---|
| ४९,३९६.०० | **रोख शिल्लक** | | २४,००२.०० |
| २४,९७०.५० | **बँक शिल्लक** | | |
| २४,९७०.५० | ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि. (चालू खाते) | १,२६,१८२.०० | |
| – | जयहिंद को–ऑप. बँक लि. (बचत खाते) | १,३४,१६५.०० | २,६०,३४७.०० |
| ८७,४००.०० | **गुंतवणूक** | | |
| १००.०० | ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक. लि. (भाग) | १००.०० | |
| ७,३००.०० | ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक. लि. (राखीव निधी) | ७,३००.०० | |
| ८०,०००.०० | ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक. लि. (मुदत ठेव) | २०५,०००.०० | |
| – | डोंबिवली मा. सह. बँक. लि. (मुदत ठेव) | ५००,०००.०० | |
| – | जयहिंद को–ऑप. बँक लि. (मुदत ठेव) | १०,०००.०० | ७,२२,४००.०० |
| ५८,९१,५४१.०० | **कर्जे** | | |
| ४२,८२,९११.०० | १) सभासद कर्ज | ६१,०१,६९२.०० | |
| १६,०८,६३०.०० | २) दैनंदिन ठेव कर्ज | १५,९७,०२१.०० | |
| | ३) मुदत ठेव तारण कर्ज | १,२९,८००.०० | |
| | ४) राष्ट्रीय बचत रोखे () तारण कर्ज | १,३९,६००.०० | |
| | ५) वस्तू खरेदी तारण कर्ज | २,७९,९५०.०० | |
| | ६) सोने तारण कर्ज | १,३१,३५०.०० | ८३,७९,४१३.०० |
| ७८७८०.०० | **फर्निचर व डेडस्टॉक** | | |
| | मागील शिल्लक | ७८,७८०.०० | |
| | चालू खरेदि | + २२,८१५.०० | |
| | एकूण | १,०१,५९५.०० | |
| | झीज १०% | – १०,१५९.०० | ९१,४३६.०० |
| ९,०००.०० | कार्यालय डिपॉझिट | | १,०७,०००.०० |
| – | टेलिफोन अनामत | | १,०००.०० |
| – | वीज अनामत | | ३७०.०० |
| ३,२७०.०० | अधेसिव्ह स्टॅम्प | | ३,५७०.०० |
| ६,२१३.०० | येणे ठेवीवरील व्याज | | – |
| ६१,५०,५७०.५० | एकूण | | ९५,८९,५३८.०० |

**श्री. अविनाश ना. खानविलकर**
उपाध्यक्ष

**श्री. जयवंत बं. काटकर**
अध्यक्ष

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ, जि. ठाणे

## उत्पन्न खर्च पत्रक

दिनांक : १/४/२००० ते ३१/३/२००१

| खर्च बाजू | रक्कम रु. | जमा बाजू | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| दै. ठेव कमिशन | १,३०,११६.०० | व्याज जमा | ११,९७,२६०.०० |
| ठेव व्याज | ३,८५,४०५.०० | बँक व्याज जमा | ६२९४.०० |
| बँक चार्जेस | ७००.०० | नोटीस फी वसुल | ७१००.०० |
| छपाई व लेखन साहित्य | ३६,८१०.०० | बँक लाभांश | १८.०० |
| किरकोळ खर्च | १५,२४५.०० | सर्व्हिस चार्जेस जमा | ५५५.०० |
| प्रवास खर्च | १०,४४६.५० | किरकोळ जमा | २१२८.०० |
| दसरा लक्ष्मी पुजन खर्च | २,३८६.०० | | |
| कर्मचारी वेतन | १,१७,१२८.०० | | |
| सानुग्रह अनुदान | ११,८४०.०० | | |
| टेलिफोन खर्च | १,३४४.०० | | |
| विज बिल | ३,६५३.०० | | |
| वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | ८,५४२.०० | | |
| विषेश साधारण सभा खर्च | २००.०० | | |
| जाहिरात | १०,९२१.०० | | |
| कार्यालय भाडे | २३,६००.०० | | |
| शिक्षण निधी | ५,०००.०० | | |
| कर्मचारी प्रशिक्षण खर्च | ६,८२८.०० | | |
| आकौंटिंग चार्जेस | २,०००.०० | | |
| ऑडिट फी | १०,०००.०० | | |
| पोस्टेज व टेलिग्राम | २,०२९.०० | | |
| सभासद वर्गणी (ठाणे जि. स. बोर्ड) | ५००.०० | | |
| लॉकर चार्जेस | ३५०.०० | | |
| अंतर्गत हिशेब तपासणीस मानधन | ६,०००.०० | | |
| संचालक भत्ता | ४,४१०.०० | | |
| सचिव मानधन | ३,०००.०० | | |
| घसारा १०% (फर्निचर) | १०,१५९.०० | | |
| निव्वळ नफा | ४,०४,७४२.५० | | |
| एकूण | १२,१३,३५५.०० | एकूण | १२,१३,३५५.०० |

श्री. शशिकांत म. शिर्के
सचिव

श्री. प्रकाश शं. पवार
खजिनदार

श्री. अविनाश ना. खानविलकर
उपाध्यक्ष

श्री. जयवंत बं. काटकर
अध्यक्ष

# नफा विभागणी पत्रक

दिनांक : २००८ – २००९

| अ. क्र. | तपशील | | नफा विभागणी रक्कम | एकूण नफा |
|---|---|---|---|---|
| १ | मागील शिल्लक नफा | ४१७.५० | | |
| | अधिक चालू वर्षाचा नफा | ४०४,७४२.५० | | ४,०५,१६०.०० |
| २ | राखीव निधी २५% | | १,०१,२९०.०० | |
| ३ | लाभांश समीकरण निधी | | १,५००.०० | |
| ४ | रौप्य महोत्सव निधी | | ४,५००.०० | |
| ५ | धर्मदाय निधी | | १,०००.०० | |
| ६ | सभासद कल्याण निधी | | २,०००.०० | |
| ७ | संशयीत बुडीत कर्ज निधी | | १३,५००.०० | |
| ८ | संगणक निधी | | ३५,०००.०० | |
| ९ | लाभांश ११% प्रमाणे | | २,४६,१०३.०० | |
| १० | शिल्लक नफा | | २६७.०० | |
| | एकूण रुपये | | ४,०५,१६०.०० | ४,०५,१६०.०० |

श्री. शशिकांत म. शिर्के
सचिव

श्री. प्रकाश शं. पवार
खजिनदार

श्री. अविनाश ना. खानविलकर
उपाध्यक्ष

श्री. जयवंत बं. काटकर
अध्यक्ष

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ, जि. ठाणे

## अंदाज पत्रक

सन २००१ – २००२

| जमा | रक्कम रु. | नावे | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| कर्जावरील व्याज | १५,२०,०००.०० | छपाई लेखन साहित्य | ६०,५००.०० |
| बँक व्याज | ९०,०००.०० | किरकोळ खर्च | १०,०००.०० |
| बँक लाभांश | १८.०० | प्रवास खर्च | १५,०००.०० |
| | | पोस्टेज/टेलीग्राम | ३,०००.०० |
| | | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | ९,०००.०० |
| | | संचालक भत्ता | ७,८००.०० |
| | | ऑडिट फी | १३,०००.०० |
| | | शिक्षण निधी | ५,०००.०० |
| | | कर्मचारी वेतन | १,७०,०००.०० |
| | | अंतर्गत हिशोब तपासनीस मानधन | ६,०००.०० |
| | | जाहिरात | ५,०००.०० |
| | | देणे ठेवीवरील व्याज | ५,४०,०१८.०० |
| | | कार्यालय भाडे | ४८,०००.०० |
| | | सचिव मानधन | ५,०००.०० |
| | | वीज बील | ८,०००.०० |
| | | टेलिफोन बील | ५,०००.०० |
| | | कर्मचारी बोनस | १२,०००.०० |
| | | ठेव कमिशन | १,९०,०००.०० |
| | | कर्मचारी प्रशिक्षण | ५,०००.०० |
| | | लॉकर भाडे | ३५०.०० |
| | | अपेक्षित नफा | ४,९२,३५०.०० |
| एकूण | १,६१,००१८.०० | एकूण | १,६१,००१८.०० |

श्री. शशिकांत म. शिर्के
सचिव

श्री. अविनाश ना. खानविलकर
उपाध्यक्ष

श्री. प्रकाश शं. पवार
खजिनदार

श्री. जयवंत बं. काटकर
अध्यक्ष

| पोट नियम | सध्याचे पोट नियम | पोट नियम दुरुस्ती | दुरुस्तीचे कारण |
| --- | --- | --- | --- |
| ह. १.८ | वार्षिक साधारण सभेत अगर विशेष साधारण सभेत निवडून आलेल्या १३ सदस्यांची व्यवस्थापक समिती बनेल. पैकी १ सदस्य अनुसुचित जाती/जमाती व १ सदस्य की, जो आर्थिक दृष्टया मागासलेल्या गटातील सदस्यांमधून असावा. अशी व्यवस्थापक समिती, अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटणीस, खजिनदार व समिती सदस्य निवडून आलेल्या सदस्यांतून निवडेल. व्यवस्थापक समितीची गणसंख्या (Quorum) सात राहिल.<br>संचालक मंडळाची मुदत ५ वर्षे (सहकारी वर्ष) राहिल. संचालक मंडळाची निवडणूक गुप्त मतदान पध्दतीने घेतली पाहिजे. संचालक मंडळाच्या निवडणुकीस पुरेशे अर्ज न आल्यास साधारण सभेत निवड करावी. निवड न झाल्यास उपनिबंधकांना विद्यमान चेअरमन, सेक्रेटरी यांनी कळविले पाहिजे व त्यांच्या सुचनेनुसार व्यवस्था केली पाहिजे.<br>कलम ७३ अ प्रमाणे सलग १० वर्षापेक्षा अधिक काळ पदाधिकारी म्हणून राहता येणार नाही. व पदाधिकारी होण्यापूर्वी ५ वर्षांचा कालावधी असावा. ही अट निर्दिष्ट सहकारी संस्थासाठी लागू होईल. | वार्षिक साधारण सभेत अगर विशेष साधारण सभेत निवडून आलेल्या १३ सदस्यांची व्यवस्थापक समिती बनेल. पैकी १ सदस्य अनुसुचित जाती/जमाती व १ सदस्य की, जो आर्थिक दृष्टया मागासलेल्या गटातील सदस्यांमधून असावा. अशी व्यवस्थापक समिती, अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटणीस, खजिनदार व समिती सदस्य निवडून आलेल्या सदस्यांतून निवडेल. व्यवस्थापक समितीची गणसंख्या (Quorum) सात राहिल.<br>संचालक मंडळाची मुदत ५ वर्षे (सहकारी वर्ष) राहिल. संचालक मंडळाची निवडणूक गुप्त मतदान पध्दतीने घेतली पाहिजे. संचालक मंडळाच्या निवडणुकीस पुरेशे अर्ज न आल्यास साधारण सभेत निवड करावी. निवड न झाल्यास उपनिबंधकांना विद्यमान चेअरमन, सेक्रेटरी यांनी कळविले पाहिजे व त्यांच्या सुचनेनुसार व्यवस्था केली पाहिजे.<br>कलम ७३ अ प्रमाणे सलग १० वर्षापेक्षा अधिक काळ पदाधिकारी म्हणून राहता येणार नाही. व पदाधिकारी होण्यापूर्वी ५ वर्षांचा कालावधी असावा. ही अट निर्दिष्ट सहकारी संस्थासाठी लागू होईल. | शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे |

पुढे चालु ......

मागील पानावरुन .....

| पोट नियम | सध्याचे पोट नियम | पोट नियम दुरुस्ती | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| | पोटनियम व साधारण सभेने मंजूर केलेल्या ठरावाच्या (तरतुदीच्या) उपबंधास अधिन राहून, संस्थेचे कामकाज चालविण्याचा पूर्ण अधिकार व्यवस्थापक समितीस राहिल. संस्थेच्या कामकाजासाठी व्यवस्थापक समितीची सभा महिन्यातून एकदा भरविली पाहिजे. संचालक मंडळाच्या सभेस उपस्थित असलेल्या संचालकांना फक्त महिन्यातून एक वेळ मिटींग भत्ता रु. ३०/- घेता येईल. | पोटनियम व साधारण सभेने मंजूर केलेल्या ठरावाच्या (तरतुदीच्या) उपबंधास अधिन राहून, संस्थेचे कामकाज चालविण्याचा पूर्ण अधिकार व्यवस्थापक समितीस राहिल. संस्थेच्या कामकाजासाठी व्यवस्थापक समितीची सभा महिन्यातून एकदा भरविली पाहिजे. संचालक मंडळाच्या सभेस उपस्थित असलेल्या संचालकांना फक्त महिन्यातून एक वेळ मिटींग भत्ता रु. ५०/- घेता येईल. | |
| कर्जविषयक नियम फ. १.१ अ | राहत्या घराची दुरुस्ती । गृहपयोगी वस्तु, शिक्षण लग्न प्रसंग, आजारपणातील किंवा आजारासाठी औषधोपचार औषधे यासाठी वैयक्तिक जामिनकी कर्ज रु. ३०,००० | राहत्या घराची दुरुस्ती । गृहपयोगी वस्तु, शिक्षण लग्न प्रसंग, आजारपणातील किंवा आजारपणासाठी औषधोपचार औषधे यासाठी वैयक्तिक जामिनकी कर्ज रु. ५०,०००/- | दिवसें दिवस वाढत चाललेल्या महागाईमूळे सभासदांच्या वाढत्या आर्थिक गरजा भागविणे सोईचे व्हावे. |
| फ १.१ ब | दुचाकी वाहते, रिक्षा टॅक्सी जीप या नविन वाहनासाठी कर्ज किंमतीच्या ७५% किंवा रु. १.५० लाख यापैकी कमी असलेली किंमत. | दुचाकी वाहते, रिक्षा टॅक्सी जीप या नविन वाहनासाठी कर्ज किंमतीच्या ७५% किंवा रु. ५.०० लाख यापैकी कमी असलेली किंमत. | वाहनांच्या वाढत्या किंमतीमुळे व सभासदांच्या मागणीनुसार |
| फ १.१ क | पाच वर्षाच्या आतील जुनी दुचाकी वाहने रिक्षा, टॅक्सी व जीप यासाठी कर्ज किंमतीच्या ५०% अथवा रु. ७५,०००/- यातील जी रक्कम कमी असेल ती रक्कम. | पाच वर्षाच्या आतील जुनी दुचाकी वाहने रिक्षा, टॅक्सी व जीप यासाठी कर्ज किंमतीच्या ५०% अथवा रु. १.५० लाख यातील जी रक्कम कमी असेल ती रक्कम. | वाहनांच्या वाढत्या किंमतीमुळे व सभासदांच्या मागणीनूसार. |

पुढे चालु ......

मागील पानावरुन .....

| पोट नियम | सध्याचे पोट नियम | पोट नियम दुरुस्ती | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| ह १.१२ | अध्यक्ष/चिटणीस/व्यवस्थापक समितीने याबाबतीत अधिकार दिलेल्या समितीच्या सदस्यास स्वतःजवळ रु. ५००/- पेक्षा अधिक अगर नोंदणी अधिकाऱ्याची पुर्व मंजुरी घेऊन अधिकार दिल्या गेलेल्या रकमेपेक्षा अधिक रक्कम रोख बाकी म्हणून ठेवता येणार नाही. संस्थेच्या रोख रकमेच्या ताब्याची जबाबदारी अंगावर असलेल्या संस्थेच्या अधिकाऱ्यांनी उपयुक्त मर्यादेपेक्षा अधिक असलेल्या रकमा बँकेत अगर सर्वात अधिक जवळ असलेल्या त्या बँकेच्या शाखेत ताबडतोब भरून टाकल्या पाहिजेत. | अध्यक्ष/चिटणीस/व्यवस्थापक समितीने याबाबतीत अधिकार दिलेल्या समितीच्या सदस्यास स्वतःजवळ रु. ५०००/- पेक्षा अधिक अगर नोंदणी अधिकाऱ्याची पुर्व मंजुरी घेऊन अधिकार दिल्या गेलेल्या रकमेपेक्षा अधिक रक्कम रोख बाकी म्हणून ठेवता येणार नाही. संस्थेच्या रोख रकमेच्या ताब्याची जबाबदारी अंगावर असलेल्या संस्थेच्या अधिकाऱ्यांनी उपयुक्त मर्यादेपेक्षा अधिक असलेल्या रकमा बँकेत अगर सर्वात अधिक जवळ असलेल्या त्या बँकेच्या शाखेत ताबडतोब भरून टाकल्या पाहिजेत. | सभासदांच्या वाढत्या आर्थिक गरजा भागविल्या करिता रोख तसेच संस्थेने बचत खाते चालू केल्यामुळे व वाढत्या महागाई मुळे काही किरकोळ खर्च करणे सुलभ व्हावे म्हणून. |

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, अंबरनाथ (पू.)

नोंदणी क्रं. टी. एन्. ए. /यू. एल. आर./आर.एस.आर.(सी. आर.)/३७४/सन १९८९-९०

## दृष्टीक्षेप

| तपशिल | १९९५-९६ | १९९६-९७ | १९९७-९८ | १९९८-९९ | १९९९-२००० | २०००-२००१ |
|---|---|---|---|---|---|---|
| सभासद | ६५५ | ७७० | ८५५ | १२१७ | १२०५ | १२३० |
| भाग भांडवल | ९,२१,०७०/- | १०,८४,०००/- | १२,७३,६००/- | १४,३९,५२०/- | १७,७२,२१०/- | २२,३७,३००/- |
| ठेवी | २५,०,२५३/- | ५,२५,५१५/- | ९,५३,२००/- | १५,७७,१४१/- | ३४,१०,३७६/- | ५९,८७,२८५/- |
| कर्ज | ११,५३,२७५/- | १८,५३,०००/- | २४,९४,२४२/- | ३३,८९,७२८/- | ५८,९१,५४१/- | ८३,७९,४१३/- |
| नफा | ११८१३२/- | १,४९,९३३/- | १,७७,१०९/- | २,०१,७२७/- | २५४,२९०.५०/- | ४,०४,७४३/- |
| ऑडिट वर्ग | अ | अ | अ | अ | अ | - |

# अंतर्गत लेखा परिक्षकांचा अहवाल

आम्ही श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, अंबरनाथ या संस्थेच्या सोबत जोडलेल्या सन २०००-२००१ च्या तेरीज, उत्पन्न - खर्च पत्रक व ताळेबंदाचे लेखा परिक्षण केले असून अहवाल करतो की,

१) आमच्या लेखा परिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती माहिती व खुलासे उपलब्ध करुन दिलेले आहेत.

२) आमच्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्त्पीस येईल त्यावरुन संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थाचा १९६० चा कायदा व नियम आणि संस्थेच्या पोटनियमान्वये अपेक्षित असल्याप्रमाणे योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

३) आम्ही तपासलेले तेरीज, उत्पन्न - खर्च पत्रक व ताळेबंद संस्थेच्या हिशोबाच्या पुस्तकांशी व विवरण पत्रांशी जुळत आहेत.

४) आमच्या मते आमच्या संपूर्ण माहितीप्रमाणे तसेच आम्हाला देण्यात आलेल्या खुलाशावरुन हे हिशोब महाराष्ट्र सहकारी संस्थांचा सन १९६० चा कायदा व त्याखालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी माहिती देतात.

**संस्था : अंबरनाथ**
**दिनांक : १ मे २००१**

## अंतर्गत हिशोब तपासणीस

***श्री. विजय अमृत पाटील***
बी. कॉम., जी.डी.सी. ॲण्ड ए.

***श्री. तुकाराम अंबाजी शेंडे***

हार्दिक शुभेच्छा

- प्रो.प्रा. रोहिदास मा. दाभणे.

# ओमकार

## मेडिकल आणि जनरल स्टोअर्स

स्टेट बँक रोड, स्टेशनच्या बाजुला, अंबरनाथ (पू.)

---

# Satish Seat Cover & Service Centre

**Specialist in : Two Wheeler & Four Wheeler Cushion Work**

Near Ration Office, Kalyan Badlapur Road, Ambernath (W) 421 501.
Dist. Thane. Tel. : 911 - 681796.

---

संजय / उदय

फोन : ६८१८९४
मोबाइल : ९८२२२११४१८७

# शिव तिर्थ

## टूर्स व स्कूल बस सर्व्हीस

श्री वज्रेश्वरी मंदिर, कैलास नगर, म. हौ. बो. मार्ग, अंबरनाथ (प.) ४२१ ५०५.

हार्दिक शुभेच्छा



।। श्री स्वामी समर्थ ।।

# जागृती क्लासेस

मोरिवली – अंबरनाथ

यशस्वी मार्गदर्शन (मराठी माध्यम)

**इयत्ता ५ वी ते ७ वी सर्व विषय**

**इयत्ता ८ वी ते १० वी गणित, इंग्रजी, शास्त्र**

आमची वैशिष्टये – १) विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष. २) प्रत्येक आठवड्यात चाचणी परिक्षा ३) क्लासेस मधील विद्यार्थ्यांचा शाळेतील परिक्षेत वर्गात प्रथम क्रमांक व इतर विद्यार्थी उत्कृष्ट गुणांनी पास होतात. ४) विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेनुसार आधिक मार्गदर्शन.

**प्रवेश १ जून पासून सुरु ....**

संपर्क – सौ. मनिषा जनार्दन जाधव. फोन : ६८५५६५

---

– प्रो.प्रा. सुरेश गायकर

# दिनेश किराणा ॲन्ड जनरल स्टोअर्स

**★ZIP ★STD ★ISD ★PCO**



At Govt. Rate

&

Local Call **1 Rs. Only**

---

मोरिवली गांव – अंबरनाथ

**Ph. : 68 78 95 • 892 000**

हार्दिक शुभेच्छा



फोन : ६०८८०४

# प्रथमेश टेलर्स अँड कटपीस सेंटर

(जेन्टस् स्पेशालिस्ट)

– प्रो.प्रा. संजय निवृत्ती जाधव.

पत्ता – श्री कृष्णनगर गणेश मंदिर रोड, अंबरनाथ (पू.) जि. ठाणे.

दिलीप पतंगे

फोन : ६०७३२४

# श्रममंदिर

टूर्स अॅन्ड स्कुल बस सर्व्हिस

पत्ता – 'श्रम मंदिर' ७२/ए, विवेकानंद हौ. सो., ताडवाडी विभाग, अंबरनाथ (पूर्व).

ऑफिस : ६८३१३९ / ६८३०५६
घर : ६८८५०३

– विकास कि. कौठाळे

# शिवदर्शन

टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्स



सुमो, टोयाटो, कॉलीस, मारुती, ट्रॅक्स, टेम्पोट्रव्हलर, लक्झरी बस.

नेताजी मार्केट, मेथडीस्ट चर्च समोर, कल्याण – बदलापूर रोड, अंबरनाथ (प.) ४२१ ५०१.

Ph. : 4143432, 4189330 (Resi.) 603962.
Mobile : 09820212629


*Prop. Vijay Ghanwat*

# TRAVEL POINT SERVICES

**Ticket booking of A/C Buses, Railway Ticket, Air Ticketing, Private Vehicles On Hire Jeep (Trax) Tata Sumo, Commander etc.**

Stall No. 51, Opp. Dadar Head, Post Office, Dr. B. A. Road, Dadar (E). Mumbai - 14.

## हार्दिक शुभेच्छा



" यशाची गुरुकिल्ली"

# श्री महालक्ष्मी क्लासेस

मराठी माध्यम – इयत्ता ७ वी ते १० वी

*- प्रो.प्रा. श्री. नाथा बाबुराव लोटके*

पत्ता – मोती किराणा स्टोअर्स जवळ, श्री महालक्ष्मी नगर, अंबरनाथ (पू.)

---



फोन : ६०४९४१

# सनफ्लॉवर नर्सरी

## गार्डन कॉन्टॅक्टर

**सर्व प्रकारची गार्डन तयार करुन मिळतील.**

*- प्रो.प्रा. श्री. प्रकाश शंकर पवार*

एम. आय्. डी. सी. रोड, पुलाजवळ, अंबरनाथ (पू.) ४२१ ५०१.

---

फोन नं. : ६०७७६६



# हॉटेल ॐ गणेश

*- प्रो.प्रा. श्री. पंडित गणेश*

पत्ता – इंदिरा गांधी चौक, महालक्ष्मी नगर, अंबरनाथ (पू.)

---

## जयवंतराव काटकर ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.

## मलकापूर, जि.कोल्हापूर

*संस्थापक - श्री. जयवंतराव बंडू काटकर*

हार्दिक शुभेच्छा

फोन : ६०१५९५



## श्री हरिश्चंद्र यशवंत येरुणकर

(समाजसेवक)

फोन : ६०७८००



## अनिकेत केबल नेटवर्क

शिवाजी नगर - अंबरनाथ (पूर्व).

## सौ. माधुरी मनोहर जाधव

योगक्षेम वहाम्यहम्

एल. आय. सी. एजन्ट

दैनंदिन ठेव योजना एजन्ट (महालक्ष्मी ना.स. पतपेढी.)

६१७/२, मोरीवली, अंबरनाथ. फोन : ६८५०९४, ६८५५६५.

## ओम प्रिंटींग प्रेस

(मराठी - हिंदी - इंग्रजी)

- कमर्शिअल प्रिंटर्स
- स्क्रीन प्रिंटींग
- लेटर प्रेस
- बुक बायडिंग
- ऑफसेट
- रबर स्टॅम्प

आकर्षक लग्न पत्रिका ....

मोरीवलीगांव - अंबरनाथ (प.), फोन : ६८५०९४

# श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित

अंबरनाथ, जि. ठाणे

## कर्मचारी

श्री. सुनिल हणमंत घनवट
श्री. नाथा बाबुराव लोटके
कु. निलिमा सूर्यकांत दिवाकर
श्री. आनंदा विठ्ठल पाटील
श्री. पांडुरंग श्रीपती पाटील
कु. अर्चना गोपाळ पार्टे

## आवर्त /दैनंदिन ठेव प्रतिनिधी

श्री. निलेश नारायण दळवी
श्री. हरिष देवजी चिकणे
श्री. बापूराव भिमराव मेश्राम
सौ. निवेदिता विलास शिंदे
सौ. माधुरी मनोहर जाधव
श्री. युवराज नागराज जैन
श्री. बाळू रामदास पाटील

## कार्यालयीन वेळ

**मंगळवार ते रविवार सकाळी ८.३० ते ११.०० संध्या . ५ ते ७.३०**

**विस्तारकक्ष कार्यालय**

**मंगळवार ते रविवार - संध्या. ५ ते ७.३०**

**सभासदांसाठी सूचना :**

१) आपला पत्ता बदलला असल्यास नवीन पत्ता पूर्ण तपशीलासह संस्थेस कळवावा.

२) आपल्या वारसदारांची नोंद संस्थेच्या कार्यालयात वेळीच करुन घेणेत यावी.

३) आपला शिल्लक लाभांश संस्थेच्या कार्यालयातून घेऊन जावा.

४) आपली बचत, दैनंदिन, आवर्त, मुदत ठेव, खाती संस्थेत उघडून सहकार्य करावे.

५) आपल्या कर्जाची थकबाकी होणार नाही यांची काळजी घ्यावी.

**६) वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांच्या १० वी १२ वी पास झालेल्या मुलांचा र त्कार आयोजित केला आहे. त्यासाठी अशा विद्यार्थ्यांची नावे संस्थेच्या कार्यालयात त्यांच्या प्रमाण पत्राच्या प्रतीसह दि. ८.८.२००१ पूर्वी नोंदणे आवश्यक आहे.**

७) दर सोमवारी संस्थेचे कार्यालय बंद राहील.

८) एखाद्या महिन्यात जर कार्यालयीन रजा १५ तारखेस असेल तर त्या महिन्याची १६ तारीख ही हप्ता भरण्याची अखेरची तारीख असेल.

बुक - पोष्ट

प्रति,

श्री./सौ. ____________________

____________________

____________________

प्रेषक :

***श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित अंबरनाथ (पू.)***

३०४६, इंदिरा गांधी चौक, महालक्ष्मी नगर,

अंबरनाथ (पू.), जि. ठाणे - ४२१ ५०१.

दूरध्वनी क्र. : ९५२५१ - ६०९७९०.